# जिल्हा परिषद, नांदेड
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, स्टेशन रोड नांदेड

Email - eebnnanded@rediffmail.com

दुरध्वनी क्रमांक-०२४६२-२३४०१०


जाक्र/जिपनां/ग्रापापुवि/आस्था-1 /745 /२०२६ दिनां -24/03 /२०२६

वाचा :- १) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण ०११९/प्र.क्र.६५/पापु-१५ दि. २४.०१.२०२२

2) मा. आयुक्त भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य पुणे यांचे Empanelment of Geology and Geophisicist ची यादी जाक्र भूसवियं/सर्वे/प्र.क्र.२२/खा.से.पु./Empanelment/३४९४/२५ दि. ०१.१२.२०२५

3) या कार्यालयाचे जाहिरात क्र. ६६४/२०२६ दि. १३.०३.२०२६

4) कंत्राटी भुवैज्ञानिक थेट मुलाखत दिनांक १८.०२.२०२६

**आदेश**

संदर्भीय शासन निर्णय १ अन्वये भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील मनुष्यबळ विचारात घेत खाजगी अथवा अन्यव विभागाच्या शासकीय योजने करीता भुजल सर्वेक्षण तातडीचे पुर्ण करण्यास मर्यादा येतात हि बाब विचारात घेवून गरजेनुसार तातडीच्या भुजल सर्वेक्षण करणेसाठी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खासगी सेवा पुरवठादार यांच्या सेवा उपलब्ध करून घेणे बाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ०२ नुसार Empanelment of Geology and Geophisicist साठी पात्र ठरलेल्या भुवैज्ञानिक व भुभौतीक तज्ञांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड कार्यालयातील भुवैज्ञानिक रिक्त असलेल्या पदाच्या अनुषंगाने व कार्यालयाच्या निकडी प्रमाणे आदेशाच्या दिनांकापासून ११ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा त्या अगोदर नियमीत भुवैज्ञानिक उपलब्ध होईपर्यंत संदर्भ क्र. ०२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील खालील ०४ (चार) कंत्राटी भुवैज्ञानिक यांना निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्रं. | उमेदवाराचे नाव | राहण्याचा पत्ता | शैक्षणिक पात्रता | शेरा | पदस्थापना देण्यात आलेले कार्यालय. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. पंकज भिवराज घोगरे | शिवगर नांदेड | एम.एस्सी भुगर्भशास्त्र | निवड क्र. ०१ | ५ |
| ०२ | श्री राजेंद्र मोतीराम जोगदंड | रा.शिवराय नगर, तरोडा खु.ति.जा. नांदेड | एम.एस्सी भुगर्भशास्त्र | निवड क्र. ०२ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. नांदेड |
| ०३ | श्री. शैलेश खोब्राजी ढेंबरे | संत सेना नगर परभणी | एम.एस्सी भुगर्भशास्त्र | निवड क्र. ०३ | |
| ०४ | श्री रितेश रामेश्वर माटे | जिजाऊ नगर वरूड ता. वरूड जि. अमरावती | एम.एस्सी भुगर्भशास्त्र | निवड क्र. ०४ | |

**अटी व शर्ती :-**

1) वरीलप्रमाणे उमेदवारांची नियुक्ती हि कंत्राटी स्वरूपाची ११ महिन्याकरीता किंवा त्या पुर्वी नियमित विभागात भुवैज्ञानिक उपलब्ध होईपर्यंत करण्यात आली असून उमेदवारास कसल्याही प्रकारची पुर्व सुचना न देता किंवा काम असमाधानकरक आढळल्यास केव्हाही सेवेतून कमी करण्यात येईल.

2) उमेदवारांने जलजीवन मिशन व विविध योजनेचे व पापु योजनाचे सर्वेक्षण करणे, भुजल प्रमाणपत्र देणे, कोआर बोअर नमुन अहवाल देणे, पाणी आवक क्षमता चाचणी अहवाल देणे, Recuperation Test Report अंदाजपत्रक, नियमित संपुर्ण कार्यालयीन कामे व कार्यालय प्रमुख / खाते प्रमुख यांच्या सुचनानुसार अनुषंगीक कामे विहीत वेळेत पुर्ण करून घेणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

3) उमेदवारांना करारपत्र / बंधपत्र करून देणे अनिवार्य राहील.

4) सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने सेवेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

5) आपली शैक्षणिक पात्रता व अर्हता विषयक सर्व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील (अर्हता व पात्रता पुर्ण न झाल्यास आपणांस कंत्राटी सेवेतून कमी करण्यात येईल.

6) सर्वेक्षणाचे शुल्क संदर्भीय ०१ मधील शासन निर्णयानुसार अनुज्ञेय राहतील. तथापी एकुण मानधन प्रति महा रू. ५०,०००/- च्या मर्यादेत किंवा संदर्भीय शासन निर्णयानुसार या पैकी **जी कमी** असेल त्या मर्यादीत राहील. यांचे मानधन जि.प. विशेष निधी लेखाशिर्ष E-८४४३००२२ या लखा शिर्षातून भागविण्यात यावा.

7) सदर नियुक्ती ही एकत्रित मानधनावर असल्याने प्रवासभत्ता अथवा इतर कोणतेही लाभ देय ठरणार नाही.

8) मानधनाच्या अनुषंगाने भविष्यात लेखा परिक्षणात कांही वसुली निघाल्यास ती एकमुस्त भरणा करणे बंधनकारक राहील.

9) दररोज कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे व अनुषंगीक महत्वाच्या कामानिमीत्त सार्वजनीक सुट्टीच्या दिवसी बोलवले असता कार्यलयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

१०) संबंधितांनी आदेशाच्या दिनांका पासुन ०८ दिवसात कर्तव्यावर उपस्थित होणे बंधनकारक राहील.

११) सदरील नियुक्ती बाबत कोणत्याही प्रकारची मा. न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरीत

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड.

प्रतिलिपी-

१) मा. सचिव पाणी, पुरवठा व स्वच्छता विभाग, सातवा मजला, गोकुळदास रूग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ, नवीन मंत्रालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग मुंबई- 400 001.

२) मा. आयुक्त भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) उप संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव .

४) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

५) वरिष्ठ भुवैज्ञानि, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नांदेड यांना माहितीस्तव.

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती,.............................................. यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

७) उप विभागीय अभियंता, जि.प. पापु उपविभाग.................................... यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

८) उप अभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जि.प. नांदेड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

९) सहाय्यक लेखा अधिकारी, / तरतुद शाखा प्रस्तुत कार्यालय यांना देवून कळविण्यात संबंधितांचे मानधनाबाबत योग्य ती कार्यवाही करणे बाबत.

१०) वेतन शाखा प्रस्तुत कार्यालय यांना मानधनाच्या अनुषंगाने योग्य त्या कार्यवाहीस्तव.

११) संबंधितास

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड.

Scanned with OKEN Scanner